| | | |
|---|---|---|
| email @- | महाराष्ट्र शासन<br>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदमहाराष्ट्र ,** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव<br>call@ |
| evaluationdept@maa.ac.in | 708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- 411030 | 020-24476938 |

जा.क्र. शैसंप्रपम/मूल्यमापन/SAC/2023/3357
दिनांक- 20/07/2023

प्रति,

1. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
2. उपसंचालक, विभागीय विद्याप्राधिकरण (सर्व),
3. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
4. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक, योजना ) जि.प.(सर्व),
5. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई मनपा.
6. शिक्षण निरीक्षक, मुंबई (उत्तर, दक्षिण, पश्चिम),
7. प्रशासन अधिकारी, म.न.पा./न.पा./न.प. (सर्व)

**विषय:-** **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे राज्य मूल्यमापन कक्ष अंतर्गत प्रतिनियुक्ती/कंत्राटी पदांच्या निवड प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:-** **शासन निर्णय क्रमांक, संकीर्ण-2023/प्र.क्र.08/एसडी-6, दि.24 एप्रिल, 2023**

उपरोक्त विषयान्वये, STARS (Strengthening Teaching & Learning and Results for States) प्रकल्प अंतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे राज्य मूल्यमापन कक्ष स्थापन करणेबाबत संदर्भीय शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य मूल्यमापन कक्षांतर्गत विविध पदांवर नियुक्तीसाठी निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर पदभरती प्रतिनियुक्ती अथवा कंत्राटी तत्त्वावर करण्यात येणार आहेत. त्यानुसार पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन आवेदन पत्रे मागविण्यात येत आहेत.

पात्र व इच्छुक उमेदवारांनी आपले आवेदनपत्र https://forms.gle/nZ6mQXvEYDqHp9Lv7 या लिंकद्वारे सादर करावीत. **आवेदनपत्र ऑनलाईन सादर करण्याचा कालावधी दि.22 जुलै,2023 ते 31जुलै,2023 राहील.**

सदर पत्र व लिंक परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

राज्य मूल्यमापन कक्षातील पदांवर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता, अनुभव, याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे असेल.

| क्र. | पदाचे नाव | पद संख्या | पात्रता | अनुभव | नियुक्तीचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विषय तज्ज्ञ ( मराठी) | २ | मराठी विषयात पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |
| 2 | विषय तज्ज्ञ (इंग्रजी) | १ | इंग्रजी विषयात पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |
| 3 | विषय तज्ज्ञ ( उर्दू) | १ | उर्दू विषयात पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |
| 4 | विषय तज्ज्ञ ( गणित) | २ | गणित विषयात पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | विषय तज्ज्ञ (विज्ञान) | २ | विज्ञान शाखेतून पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |
| 6 | विषय तज्ज्ञ (सामाजिक शास्त्रे) | २ | इतिहास /राज्यशास्त्र/भूगोल/ सामाजिक शास्त्र विषयात पदवी / पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. असल्यास प्राधान्य | शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था मधील अध्यापनाचा ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभव | प्रतिनियुक्ती |
| 7 | मूल्यमापन तज्ज्ञ | २ | कोणत्याही विषयात पदव्युत्तर पदवी व बी. एड. / एम.एड. / पी.एच.डी. असल्यास प्राधान्य | अध्यापनाचा किमान ३ वर्षाचा अनुभव ,संशोधन कार्याचा अनुभव | कंत्राटी |
| 8 | मानसोपचार तज्ज्ञ | २ | मानसशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी | पदासाठी ०३ वर्ष राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरावर चाचण्या विकसन व अंमलबजावणीचा अनुभव | कंत्राटी |
| 9 | माहिती विश्लेषक | १ | कोणत्याही विषयात पदव्युत्तर पदवी , संख्याशास्त्र विषयात पदवी अथवा पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य | किमान ३ वर्ष माहिती विकसन, संकलन, विश्लेषण व अहवाल निर्मितीचा अनुभव | कंत्राटी |
| 10 | कार्यक्रम व्यवस्थापक | १ | कोणत्याही विषयात पदव्युत्तर पदवी, व बी.एड. एम.एड., पी.एच.डी असल्यास प्राधान्य | SCERT व्यतिरिक्त शालेय शिक्षण विभागाच्या संस्थामधील अधिकारी अथवा सेवानिवृत्त अधिकारी | प्रतिनियुक्ती **अथवा** सेवानिवृत्त अधिकारी असल्यास कंत्राटी |

**<u>राज्य मूल्यमापन कक्षातील कर्मचारी यांची निवड व नियुक्तीसाठी अटी व शर्ती</u>**

❖ **प्रतिनियुक्तीद्वारे निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारास पुढील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

1. प्रतिनियुक्ती स्वरूपातून नियुक्त करावयाच्या पदांसाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे शाळांतील शिक्षक / शालेय शिक्षण विभागातील अधिकारी यांचेमधून मुलाखत अथवा अन्य निवड प्रक्रिया राबवून उमेदवारांची निवड करण्यात येईल.
2. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांची छाननी करुन, उमेदवारांना पात्रता पडताळणी व मुलाखतीचे नियोजन कळविणेत येईल.
3. प्रतिनियुक्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील (जि.प./ न.प./ म.न.पा.) प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, माध्यमिक शिक्षक तसेच केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण), गटशिक्षणाधिकारी / उपशिक्षणाधिकारी / अधिव्याख्याता / जेष्ठ अधिव्याख्याता, शिक्षणाधिकारी यांना उमेदवारी अर्ज दाखल करता येईल.
4. प्रतिनियुक्तीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची सेवा निवृत्तीस दोन वर्षे शिल्लक असल्यास प्रतिनियुक्तीस अर्ज करता येणार नाही.
5. प्रतिनियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारास जिल्हास्तरावर, विभागस्तरावर व राज्यस्तरावर विविध स्वरुपाचे काम करण्याचा अनुभव असावा.
6. उमेदवारास संगणक ज्ञान असणे, मराठी व इंग्रजी टायपिंग करता येणे आवश्यक आहे.
7. सदरची निवड ही राज्यशासनाच्या प्रतिनियुक्ती नेमणुकी संदर्भातील प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल. मात्र प्रतिनियुक्तीचा कालावधी STARS प्रकल्प सुरु असे पर्यंत असेल अथवा STARS प्रकल्पाची मुदत संपल्यानंतर शासनाने राज्य मूल्यमापन कक्ष सुरु ठेवण्यास मुदतवाढ दिल्यास प्रतिनियुक्ती सुरु राहू शकेल.
8. प्रतिनियुक्ती कालावधीमध्ये कोणताही विशेष भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
9. प्रतिनियुक्ती कालावधीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचे वेतन व भत्ते मूळ आस्थापनेवरुन काढण्यात येतील.
10. सुरुवातीस प्रतिनियुक्ती कालावधी हा एक वर्षाचा असेल त्यानंतर मूल्यमापन करण्यात येईल. मूल्यमापनातील प्रतिसादानुसार पुढील नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल.
11. विषयतज्ज्ञ या पदावर प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी दिलेल्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करणे बंधनकारक राहील.
12. प्रतिनियुक्ती कालावधीमध्ये संबंधितांचे काम समाधानकारक नसल्यास अथवा संस्थेच्या प्रतिमेस / हितास बाधा पोहोचेल असे गैरवर्तन केलेले निदर्शनास आल्यास त्यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करून मूळ आस्थापनेवर रुजू व्हावे लागेल. तसेच अशा प्रसंगी प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

13. प्रतिनियुक्तीने निवड झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८९ मधील तरतूदीनुसार देय ठरणाऱ्या नैमत्तिक, अर्जित व वैद्यकीय रजा अनुज्ञेय राहतील. प्रतिनियुक्ती कालावधीत शिक्षकांना दीर्घ मुदत सुटी लागू असणार नाही.
14. प्रतिनियुक्तीने अर्ज करणाऱ्या उमेदवाराने कार्यरत आस्थापनेवरील संनियंत्रण अधिकारी / सक्षम प्राधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र मुलाखतीवेळी सादर करणे आवश्यक आहे.
15. प्रतिनियुक्तीने विषयतज्ज्ञ या पदावर निवड झाल्यानंतर रुजू होताना मूळ आस्थापनेकडील कार्यमुक्ती प्रमाणपत्र व विहित नमुन्यामध्ये बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

❖ **कंत्राटी पद्धत्तीने निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारास पुढील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

1. कंत्राटी तत्तवावर नियुक्ती करावयाच्या पदांसाठी ऑनलाईन स्वरुपात आवेदन पत्रे मागवून उमेदवाराची मुलाखत अथवा अन्य निवड प्रक्रिया करून उमेदवारांची निवड करण्यात येईल.
2. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांची छाननी करुन, उमेदवारांना पात्रता पडताळणी व मुलाखतीचे नियोजन कळविणेत येईल.
3. कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी या पत्रामध्ये विहित अटींची पूर्तता करणाऱ्या पात्रताधारक उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरता येईल.
4. कंत्राटी स्वरुपात निवड ही ११ महिन्यांसाठी असेल.
5. कंत्राटी सेवेचा ११ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर त्या पदावर पुढील सेवेच्या कालावधीसाठी कोणताही हक्क असणार नाही. तसेच ११ महिन्यांच्या आत STARS प्रकल्पाची मुदत संपल्यास सेवा समाप्त करण्यात येईल अथवा STARS प्रकल्पाची मुदत संपल्यानंतर शासनाने राज्य मूल्यमापन कक्ष सुरु ठेवण्यास मुदतवाढ दिल्यास ११ महिन्यापर्यंत सेवा सुरु राहू शकेल.
6. ११ महिन्याचा सेवा कालावधी पूर्ण झालेनंतर संबंधित कर्मचाऱ्याचे काम समाधानकारक असल्यास, १ दिवसाचा खंड देऊन (खंडाच्या दिवशी रविवार वा सार्वजनिक सुटी आल्यास पुढील दिवस) वेळोवेळी (प्रकल्प पूर्ण होईपर्यंत अथवा राज्य मूल्यमापन कक्षास शासन मान्यता असेपर्यंत) पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ दिली जाऊ शकेल.
7. उमेदवारास संगणक ज्ञान असणे, मराठी व इंग्रजी टायपिंग करता येणे आवश्यक आहे.
8. मूल्यमापन तज्ज्ञ यांचे साठी दरमहा रुपये ६०,०००/- एकत्रित मानधन देय असेल.
9. मानसोपचार तज्ज्ञ यांचे साठी दरमहा रुपये ६०,०००/- एकत्रित मानधन देय असेल.
10. माहिती विश्लेषक यांचे साठी दरमहा रुपये ५०,०००/- एकत्रित मानधन देय असेल.
11. कार्यक्रम व्यवस्थापक हे पद शालेय शिक्षण विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांचेमधून कंत्राटी तत्वावर निवडल्यास यांचेसाठी दरमहा रुपये ६०,०००/- एकत्रित मानधन देय असेल.
12. कंत्राटी स्वरूपातील सेवा कालावधीमध्ये कोणताही विशेष भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
13. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी दिलेल्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करणे बंधनकारक राहील.
14. सेवा कालावधीत एखाद्या कर्मचाऱ्याकडून कोणताही अनुचित प्रकार, गैरवर्तन वा इतर गंभीर बाब घडल्यास त्यास सेवेतून कोणत्याही क्षणी काढून टाकण्याचा अधिकार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना असेल. तसेच अशा प्रसंगी प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
15. कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीस अर्ज करणाऱ्या उमेदवाराने सक्षम प्राधिकारी यांचे चारित्र्य पडताळणी / वर्तणूक प्रमाणपत्र तसेच आवश्यक मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

❖ **मूल्यमापन कक्षातील पदांची कार्ये:-**

**1. विषय तज्ज्ञ व मूल्यमापन तज्ज्ञ**

- राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांचे नियतकालिक मूल्यांकन करण्यासाठी परिषदेतील विषय विभागाकडून इयत्तानिहाय व विषयनिहाय विविध चाचण्या, प्रश्नपेढी (Item Bank) चे विकसन करणे. तयार करण्यात आलेल्या चाचण्यांचे प्रमाणिकरण करणे.
- राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांचे नियतकालिक मूल्यांकन करण्यासाठी परिषदेतील विषय विभागाकडून इयत्तानिहाय व विषयनिहाय विविध चाचण्या, प्रश्नपेढी (Item Bank) चे विकसन करणे.
- राज्यस्तरावरून घेण्यात येणाऱ्या विविध सर्वेक्षण साहित्याचे विकसन (चाचणी पुस्तिका, उत्तरपत्रिका, शिक्षक प्रश्नावली, मुख्याध्यापक प्रश्नावली इ.) करणे. माहिती विश्लेषण करणे, सर्वेक्षण अहवाल तयार करणे.
- शिक्षकांना मूल्यमापन विषयक प्रशिक्षण देण्यास सहाय्य करणे.
- विषयनिहाय शिक्षकांच्या गरजांची निश्चिती करणे.
- शिक्षकांसाठी गरजाधिष्ठित प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- समग्र प्रगती पत्रक (HPC) चे विकसन शाळास्तरावर अंमलबजावणी करणे.
- विद्यार्थ्यांच्या संपादणूकीचे सातत्याने मूल्यमापन करून गुणवत्ता समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना करणे.
- NCERT, PARAKH या संस्थांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मूल्यमापन पद्धती, सर्वेक्षण इत्यादी कामकाज पाहणे.
- सार्थक पुस्तिकेमधील NEP टास्कची प्रभावी अमलबजावणी करणे.

- राष्ट्रीय व राज्यस्तरीय विविध अहवाल (उदा. NAS, ASER, FLS, SLAS, PAT) यांचे विश्लेषण संबधित विषयातील संपादणूक वाढविण्यासाठी पुढील कार्यदिशा निश्चित करून अंमलबजावणी करणे.
- राज्याच्या शालेय शिक्षणाच्या मूल्यमापन पद्धतीमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय निकषांच्या आधारे सुधारणा करणे.
- मूल्यमापन संबंधातील सर्व कामकाज परिषदेतील मूल्यमापन विभागाच्या सनियंत्रनाने करणे.

2. **मानसोपचार तज्ज्ञ:**
   - राज्य मूल्यमापन कक्षातील विषय तज्ज्ञ यांना मानसशास्त्रीयदृष्ट्या अचूक चाचणी विकसन करण्यासाठी मदत करणे.
   - विषय तज्ज्ञ यांचे मार्फत तयार करण्यात आलेल्या चाचण्यांचे प्रमाणीकरण करणे.
   - प्रमाणीकरण केलेल्या चाचण्यांची विषय तज्ज्ञ यांचे सहायाने पथदर्शी स्वरूपात अंमलबजावणी करणे.
   - राष्ट्रीय व राज्यस्तरीय सर्वेक्षण अहवालाचे मानसशास्त्रीय दृष्टीने विश्लेषण करणे.
   - राज्यस्तरीय सर्वेक्षण अहवाल निर्मितीसाठी राज्य मूल्यमापन कक्षास सहाय्य करणे.
   - आवश्यकतेनुसार दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन सेवा देणे.
   - मूल्यमापन संबंधातील सर्व कामकाज परिषदेतील मूल्यमापन विभागाच्या सनियंत्रनाने करणे.

3. **माहिती विश्लेषक:**
   - परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या विविध सर्वेक्षणातून संकलित होणाऱ्या माहितीचे विविध प्रकारे विश्लेषण करणे.
   - राष्ट्रीय स्तरावरून घेण्यात येणाऱ्या विविध सर्वेक्षण अहवालांचे विश्लेषण करणे.
   - शाळास्तरावर घेण्यात येणाऱ्या विविध नियतकालिक चाचण्यांचा data analysis करणे.
   - विद्या समीक्षा (VSK) केंद्राची माहिती विश्लेषणात मदत घेणे .
   - विषय तज्ज्ञ यांना चाचणी विकसन व विविध सर्वेक्षण व मूल्यांकन अहवाल तयार करण्यास मदत करणे.

4. **कार्यक्रम व्यवस्थापक:**
   - मूल्यमापन कक्षातील सर्व कर्मचारी यांच्याशी समन्वय साधून दिनांक २४ एप्रिल २०२३ च्या राज्य मूल्यमापन कक्ष शासन निर्णय मधील उद्दिष्टानुसार कामकाज पाहणे.
   - परिषदेतील मूल्यमापन विभाग यांच्या संनियंत्रणाखाली व समन्वयाने राज्य मूल्यमापन कक्षाचे कामकाज पाहणे.
   - मूल्यमापन कक्षातील सर्व कर्मचारी यांच्या सहकार्याने मूल्यमापन विषयक सर्व प्रकारचे कामकाज मूल्यमापन विभागाच्या सनियंत्रनाने पाहणे.
   - विद्या समीक्षा केंद्र (VSK) यांचे आवश्यक ते सहाय्य घेणे.

**उपरोक्त निवडप्रक्रियेसाठी यासोबत दिलेल्या लिंकच्या माध्यमातून online अर्ज करणे बाबत आपल्या अधिनस्त अधिकारी / शिक्षक यांना अवगत करावे.** आवेदपत्र लिंक साठी पुढील क्यू.आर. कोडचा उपयोग करता येईल.

https://forms.gle/nZ6mQXvEYDqHp9Lv7

**(कौस्तुभ दिवेगावकर,भा.प्र.से.)**
**संचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र पुणे.

**प्रत, आवश्यक कार्यवाहीसाठी.**
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
- आयुक्त महानगरपालिका, सर्व
- मुख्याधिकारी, नगरपरिषद, सर्व

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
- मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
- मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई